*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XIII / Issue – III* *ISSN 2277-8063*

# भारताच्या जडणघडणीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान - एक ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. मधुकर खंडू पवार** सहाय्यक प्राध्यापक गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर मोबाईल . ९८५०३८९८०५

---

**प्रस्तावना :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विलक्षण राष्ट्रनिष्ठा असलेले व्यक्तिमत्व! त्यांच्यासारखी प्रखर राष्ट्रनिष्ठा असलेली दुसरी व्यक्ती या देशात पहावयास मिळणार नाही. या देशातील तळागाळातील लोकांना समतेचा बंधुत्वाचा आणि न्यायाचा विचार देऊन एका सरळ रेषेत उभे करण्याचे सामर्थ्य आंबेडकर नावाच्या प्रज्ञासम्राटात आहे. नागावलेल्या माणसाला समतेचे सदस्यत्व त्यांनी बहाल केले. त्यामुळेच येथील सामान्य माणूस ताठ मानाने जीवन व्यतीत करताना आज दिसतो. या देशातील शेवटच्या माणसात हा देश माझा आहे ही भावना निर्माण झाली .कणा मोडलेल्या बहिष्कृत असलेल्या समाजाला आपल्या भारत देशाविषयी आदर वाटतो हा करिष्मा डॉ. बाबासाहेब च्या राष्ट्रीय विचारामुळे शक्य झाला आहे.या देशातील प्रत्येक माणसाला राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे कार्य डॉ.आंबेडकरांच्या विचाराने आणि आचारनाने केलेले आहे. यातील प्रत्येक व्यक्तीला वन मॅन वन व्हॅल्यू चा क्रांति विचार दिलेला आहे. त्यांच्या राष्ट्रीय निष्ठेचे प्रतिबिंब भारतीय संविधानाच्या प्रत्येक पानावर प्रतिबिंबित झालेले आपणास पाहावयास मिळते. काही हिऱ्यामध्ये अगणित पैलू असतात. त्यातील काहीच पैलू नजरे पुढे येतात. बाबासाहेब असेच हिरे होते .त्यांची भाषणे, त्यांचे लेख, त्यांचे राजकारण, त्यांनी लिहिलेले पुस्तके हे पेलू वारंवार जगा पुढे आले. त्यांच्यातील अनेक पैलूंची म्हणावी तशी चर्चा घडली नाही.बाबासाहेब अर्थतज्ञ, होते. त्यांना लोकसंख्याविषयक प्रचंड ज्ञान होते. ते जलतज्ञही ,होते." नद्याजोड प्रकल्प" ही त्यांची योजना. कामगारासाठी त्यांनी खूप काही केले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार , बाबासाहेबांचे शिक्षण विषयक विचार
त्यांना संगीत ,आवडायचे ते व्हायोलिन ,वाजवायचे ते खूप हळवे ही होते! त्यांच्या अशा नानाविध पैलूंचा घेतलेला हा वेध भारताच्या जडणघडणीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान -एक ऐतिहासिक अभ्यास
प्रस्तुत शोधनिबंधाचे विषय विवेचन पुढील प्रमाणे आहे.

**संशोधन लेखनाचा उद्देश :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समजून घेणे आणि चर्चा करणे.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे " नद्याजोड" प्रकल्पातील योगदान समजून घेणे.
डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचे "रुपयाचा प्रश्न याबाबतचे विचार अभ्यासणे.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगाराच्या हितासंबंधी केलेले कायदे यावर चर्चा करणे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेतील योगदान अभ्यासणे.
डॉ. आंबेडकर यांचे भारताच्या विविध जडणघडणी मधील योगदान अभ्यासणे.

**संशोधन पद्धती व साधने**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. तसेच दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला आहे .त्यासाठी प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्र, मासिके, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

**पोरापेक्षा ग्रंथ मला प्रिय आहेत:** माझे ग्रंथ हे माझे जिवाभावाचे सोबती आहेत. पत्नी आणि पोटाच्या पोरापेक्षाही पुस्तके मला जास्त प्रिय आहेत. असे विचार बाबासाहेबांनी लिहिलेल्या पत्रात नोंदविले आहेत. लहानपणी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगलेल्या बाबासाहेबांना केळुस्कर गुरुजींनी दिलेले" बुद्धचरित्र" हे पहिले पुस्तक आयुष्यभर जपून ठेवले. अमेरिका इंग्लंड मध्ये शिकत असताना. जुन्या बाजारातून स्वस्तात पुस्तके खरेदी केली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर. पुस्तकाच्या २४ पेट्या घेऊन ते भारतात परतले. आपल्या समृद्ध आणि प्राणप्रिय ग्रंथसंग्रहासाठी "राज्यगृह " बांधून आणि त्यात संस्कृत, हिंदी, मराठी, इंग्रजी, उर्दू ,भाषेतील दर्जेदार वाङ्मया सोबत तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, तर्कशास्त्र, अशा सर्व विषयावरचे ग्रंथ, चरित्र, वेद ,उपनिषदे, संदर्भ ग्रंथ ठेवले होते. त्यांच्या ग्रंथालयात किती पुस्तके होती. याची आकडेवारी डॉ. आंबेडकर यांच्या आठवणी या पुस्तकात दिली आहे. थक्क करणारी आहे. राजकारण- ३००० इतिहास - २६०० कायदा - ५००० - धर्म- २००० चरित्रे- १२०० साहित्य - १३०० अर्थशास्त्र - ११०० तत्त्वज्ञान-६०० युद्धशास्त्र -३०० इतर- ७९००

**"नद्याजोड "प्रकल्पाचे प्रवर्तक :** पाण्यामुळेआज महाराष्ट्रात दुष्काळाची परिस्थिती आहे. पाण्याच्या बाबतीत बाबासाहेब किती गंभीर होते याचे विस्तृत वर्णन एलं .टी . लवात्रे यांनी केले आहे. "बिहारमध्ये १९४३ साली भीषण पूर आला. ७० गावी नष्ट झाली.११ हजार घरे वाहून गेली.पुराने बंगाल आणि भारताचा संपर्क तुटला. पुढे बंगालमध्ये दुष्काळाने पंचवीस हजार लोक मरण पावले. तेव्हा, या नदीवर दामोदर धरण बांधण्याची कल्पना बाबासाहेबांनी मांडली ती.योजना ब्रिटिशांच्या गळी उतरवली.तिचे काम सुरू झाले. बिहार, ओरिसा आणि बंगालला, जीवदान दिले. व्हॉइसरायच्या मंत्रिमंडळात असताना त्यांनी नदीजोड प्रकल्पाची कल्पना मांडली. जलवाहतूक, वीजनिर्मिती, पावर ग्रिड, या कल्पनाही त्यांनीच मांडल्या.१

**"रुपया "चे भाष्यकार :** बाबासाहेबांनी "डॉक्टर ऑफ सायन्स" या पदवीसाठी, "रुपयाचा प्रश्न" प्रबंध लिहिला. या प्रबंधामध्ये त्यांनी १८०० ते १८९३या कालखंडात भारतीय रुपयाची विनिमयाचे परिमाण म्हणून जडणघडण कशी झाली. ते स्पष्ट केले. पुढे जेव्हा भारतीय रुपयाची जडणघडण सुरू होती. तेव्हा ती सुवर्ण परिमाणात [ गोल्ड स्टॅंडर्ड] असावी की सुवर्ण विनिमय परिमाणात [ गोल्ड

एक्सचेंज ] असावा असा वाद सुरू होता. बाबासाहेबांचा युक्तिवाद असा होता. "सुवर्ण विनिमय परिमाणात आर्थिक स्थैर्य राहू शकत नाही. या परिभानामध्ये चलन निर्मिती लवचिक जरूर असेल, परंतु ती अनिर्बंध होण्याची शक्यता
नाकारता येत नाही. त्यामुळे भाववाढ होऊन रुपयाची किंमत घसरणार, पुढे

**एक भाषा, एक राज्य :** भारत खऱ्या अर्थाने राष्ट्र या संज्ञेला प्राप्त ठरावा, त्यासाठी देशाची एक राष्ट्रभाषा असावी आणि ते स्थान हिंदी भाषेला प्राप्त व्हावे असे बाबासाहेब म्हणत." फाजलअली कमिशनने राज्याची पुनर्रचना भाषांच्या आधारावर सुचवली.एकूण लोकसंख्येच्या अंदाजे ४८% लोकसंख्या हिंदी भाषा बोलणाऱ्याची आहे. आणि त्याचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात देशाच्या उत्तर भागात आहे. एवढ्या मोठ्या संख्येत हिंदी भाषा बोलणाऱ्या चा समावेश उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, या केवळ तीन राज्यात झाला.त्या तुलनेत दक्षिणेतील राज्य छोटी झाली. त्यामुळे एक भाषा एक राज्य ऐवजी, एक राज्य एक भाषा असे असावे. प्रशासनाच्या दृष्टीने ते सोयीचे होईल. एक भाषा बोलणाऱ्या विशालकाय राज्याची विभागणी करून लहान लहान राज्यात त्यांचे रूपांतर करण्यात यावे. प्रादेशिक भाषा जर केंद्र आणि राज्य यांच्यातील संपर्क भाषा झाली. तर प्रथम भारतीय आणि शेवटीही भारतीय ही भूमिका घेऊन भारताला खऱ्या अर्थाने एक राष्ट्र म्हणून निर्माण करण्याचे स्वप्न आपल्याला साकार करता येणार नाही.संपर्क भाषा म्हणून काही काळासाठी हिंदी सोबत इंग्रजीचा उपयोग व्हावा पण कायमस्वरूपात केवळ हिंदी भाषा असावी, असे बाबासाहेबांनी सुचविले.२

**हिंदू हितचिंतक :** " हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही", असे बाबासाहेब म्हणाले होते.हिंदू धर्माने बदलावे ही त्यांच्या मनातील कळकळ होती. ते म्हणत सर्व हिंदूंना मान्य होईल आणि सर्व हिंदूंनी मान्यता दिली आहे असा एक आणि एकच हिंदू धर्माचा ग्रंथ असावा.हिंदू धर्माचे इतर ग्रंथ जसे वेदशास्त्र, पुराने, जे पवित्र आणि आधार युक्त मानले जातात मानले जातात. त्यांचे पवित्र आणि अधिकारशीलता कायदाने नष्ट करण्यात यावी. तसेच या ग्रंथातील धार्मिक सामाजिक विचार जो कोणी सांगण्याचा शिकविण्याचा प्रयत्न करील त्याला कायद्याने शिक्षा करण्यात यावी. देशाच्या स्वातंत्र्य युद्धात देशातील सर्व लोक तुम्ही पाठीशी घेऊन लढता. समाज उद्धाराच्या लढ्यात मात्र संपूर्ण देशाच्या विरोधात, तेही एकाकीपणे तुम्हाला लढावे लागते. परंतु हे स्वराज्यापेक्षा अधिक महत्त्वपूर्ण आहे. स्वराज्याचे जर तुम्ही संरक्षण करू शकणार नसाल तर ते स्वराज्य असण्याचा काही उपयोग नाही. स्वराज्याचे संरक्षण करण्यापेक्षा अधिक महत्त्वाचा प्रश्न स्वराज्यात हिंदूचे संरक्षण करण्याचा आहे असा त्यांचा विचार होता.

**कामगाराचे हितचिंतक :** डॉ. आंबेडकर. व्हाईसरॉयच्या कौन्सिल मध्ये असताना बाबासाहेबांनी कामगारांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. दुसरे महायुद्ध सुरू असताना बाबासाहेबांनी महिलांना खाणीत पाठवू नका, त्यांना तेथे उभे राहता येत नाही. तेथे काम करायला लावू नका. असे सांगितले होते. ब्रिटिश अधिकाऱ्याने त्यावर आक्षेप घेतला. बाबासाहेबांचे म्हणणे व्हाईसरॉय पर्यंत पोहोचविले. दुसरे महायुद्ध सुरू आहे. त्यांच्या ऐकाल तर उत्पादन घटेल, अशी अधिकाऱ्याने बाजू मांडली. मात्र व्हाईसरॉयने बाबासाहेबांच्या बाजूने मत दिले. महिलांना प्रसूती रजाचा हक्क देणे. कामगारांच्या कामाचे तास ठरवण्याचा अधिकार यांचेही श्रेय बाबासाहेबांना दिले
जाते.३

**पत्रकार बाबासाहेब :** वाचा असून बोलता येत नाही. मनगटात कर्तुत्व असूनही काही करता येत नाही. मनात धग असूनही व्यक्त होता येत नाही .अशी दलित.समाजाच्या अवस्था होती. अशा काळामध्ये बाबासाहेबांनी पत्रकारितेला सुरुवात केली. केशवसुत दलित समाजाबद्दल म्हणाले. "मुकी बिचारी कोणी हका " आभाळाभर दुःख असूनही ढसाढसा आपलेपणाने अश्रू ढाळता येत नाही.अवस्था असलेल्या या" मूक "समाजाचे नायकतत्व बाबासाहेबांनी "मूकनायक" सुरू केले. उपाययोजना सुचवणारे पत्रकारिता करून बाबासाहेबांनी नागरी व ग्रामीण जीवनातील प्रश्नाचा उहापोह केला. जात, धर्म, वर्णआश्रमपद्धती शासनसंस्था आधी विषयावर मूकनायक नंतर त्यांनी बहिष्कृत भारत या पक्षिकातून सडेतोड विचार मांडले. मानवतावादी संपादकी धोरण, परिवर्तनवादी लोकपत्रकारिता, संपादनातील मूलभूत तत्व, आणि संघर्षिल पत्रकारिता बाबासाहेबांनी आयुष्यभर जोपासली.

**"माझे स्वतःचे घर विका पण दलित चळवळ चालू ठेवा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले :** माझ्या पश्चात तुम्ही सर्वांनी अस्पर्शाची चळवळ चालू ठेवावी . तुम्हाला पैशाची जरुरी भासली तर माझे घर विकून पैसे जमवा, असे एक कच्चे मृत्युपत्र बाबासाहेबांनी १९३४ साली लिहून दादासाहेब गायकवाड यांना पाठवले होते. या संदर्भातील आठवण चांगदेव खैरमोडे यांनी नोंदवली आहे. १९३४ साली आपला खून होऊ शकतो.अशी भीती बाबासाहेबांना वाटत होती. त्यामुळे त्याने कच्चे मृत्युपत्र तयार करून त्याची एक प्रत दादासाहेब गायकवाड यांना पाठवली. ती प्रत दादासाहेबांनी नाशिक येथे खैरमोडे यांना दाखवली होती. मृत्यूची कल्पना अनेकांना अस्वस्थ करते. बाबासाहेबांना मात्र तशीच अवस्थेत चळवळी विषयीची बांधिलकी कायम ठेवली. ४

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार:** मसुदा समितीमधील डॉ. आंबेडकरांचे एक सहयोगी श्री टी. टी.कृष्ण मंचुरी यांनी संविधान सभेतील एका भाषणात असे प्रतिपादन केले की, संविधान सभेने मसुदा समितीवर सात सदस्य नियुक्ती केले होते. त्यापैकी एकाने या सभागृहाचा राजीनामा दिला. आणि त्याची जागा दुसऱ्यांनी घेतली. एकाचा मृत्यू झाला आणि ती जागा रिक्त राहिली. एक अमेरिकेत निघून गेला. आणि ती जागा भरली गेली नाही. आणि एक अन्य सभासद राज्याच्या राजकारणात गुंतून पडले. त्यामुळे तेवढी पोकळी निर्माण झाली एक किंवा दोन व्यक्ती दिल्ली पासून बऱ्याच लांब होत्या आणि त्यांची प्रकृती त्यांना उपस्थित राहण्याचे अनुमती देत नव्हती. म्हणून सरते शेवटी असे घडले की. संविधानाचा मसुदा तयार करण्याचे

उत्तरदायित्व डॉ. आंबेडकरांकडे आले. कदाचित सभागृहाला या वास्तव्याची जाणीव असावी. आणि डॉक्टर आंबेडकर आणि ही जबाबदारी हे कार्य, अत्यंत योग्यपणे पार पाडले. यातील मात्र शंका नाही म्हणून आम्ही त्यांचे ऋणी आहोत.५

**लोकसंख्येच्या वाढीबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत:** लोकसंख्या वाढत जाईल आणि ती समस्या बनेल. हे बाबासाहेबांनी खूप आधी जाणले होते. लोकांच्या सुखदुःखाचा ज्या आर्थिक परिस्थितीशी संबंध असतो. त्यात सुधारणा घडवून आणण्याच्या उपाययोजनासोबतच जन्माचे प्रमाण कमी करण्याचा उपायाचा अवलंब करून वाढती लोकसंख्या नियंत्रण ठेवण्याचे आपण काळजी घेतली नाही, तर लोकांच्या जीवनमानात भरीव आणि कायमस्वरूपी वाढ होऊ शकणार नाही. ती नियंत्रणात राहील यासाठी प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. त्याशिवाय दारिद्र्याचे निर्मूलन करता येणार नाही. आणि हे जर झाले नाही ,तर वाढत्या लोकसंख्येचा देशातील विविध वस्तूंच्या उत्पादनाशी मेळ घालणे अशक्य होईल. लोकसंख्या वाढीमुळे वनाची तसेच कुरणाची जमीन दिवसेंदिवस कमी होत आहे. इतर देशाच्या तुलनेत आपल्या देशातील या जमिनीचे प्रमाण अगदीच नगण्य आहे. त्यामुळे आपल्या देशातील गुराढोराची अवस्था दयनीय आहे. अवस्तव तर वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे आज लोकांच्या निवासाची समस्या निर्माण झाली आहे. जोवर वाढत्या लोकसंख्येला आळा घातला जात नाही. तोवर केवळ समान वाटणी मुळे लोकांच्या जीवनात भौतिक सुविधा घडून येणार नाही. एवढेच नव्हे तर शासनाचे लोकांच्या सर्वतोपरी विकासाचे सर्व प्रयत्न ही व्यर्थ ठरतील.६

**व्हायोलिनप्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर:** संगीताच्या जाणकारांना ठाऊक आहे, व्हायोलिन वाजवणे सोपे नाही. मात्र असा देते साध्य करणे ही वृत्ती असलेल्या बाबासाहेबांनी व्हायोलिनसी सूर जुळवलेत्यासाठी त्यांनी दिल्लीत एक बंगाली संगीतकार आणि मुंबईत बाळ साठे हे मराठी गुरु शोधले. त्यांच्याकडून व्हायोलिनचे धडे गिरविले. साठे अजूनही हयात आहेत. एखादी गोष्ट शिकायची म्हटली की बाबासाहेबाची चिकाटी कशी आहे .असे हे यातून दिसून येते. व्हायोलिनच्या नोट्स अर्थात स्वर त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून घेतले. त्या स्वराचा अभ्यास करून, समजूनच ते व्हायोलिन वर बोट फिरवत असत. चा रियाज मध्ये सातत्य नव्हते. पण संधी मिळेल तेव्हा ते व्हायोलिनच्या सुराशी संवाद साधत.७

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार :** शिक्षणाच्या बाबतीत बाबासाहेबांनी सखोल चिंतन केले. शिक्षण हे मानवाच्या सर्वांगीण विकासाचे साधन आहे. हे बाबासाहेबांनी वारंवार प्रतिपादन केले. बाबासाहेब म्हणत सार्वजनिक समस्यावर शिक्षण तथा उच्च शिक्षण हाच उपाय आहे. पैशाचा विनयोग गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी केला पाहिजे असा आग्रह बाबासाहेबांनी सरकार जवळ आणि धनाढ्य व्यक्तीजवळही धरला. माणूस शिक्षणाच्या अभावाने माणूस गुलाम बनू शकतो आणि शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे साधन आहे .सौजन्य नसेल तर मनुष्य पशुप्रमाणेच होतो. शिक्षणासंबंधी केवळ आपले मते मांडून बाबासाहेब थांबले नाहीत. तर स्वतः बाबासाहेबांनी "पीपल्स एज्युकेशन सोसायटी "ही शिक्षण संस्था स्थापन करून त्या संस्थेद्वारे शाळा महाविद्यालय सुरू केले "पीपल्स. एज्युकेशन सोसायटीने" औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय, तर मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालय, सुरू केले. आजही सदर महाविद्यालय उत्तम रीतीने सुरू आहेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाविषयी म्हणाले मी संथ पाण्यागत शांत आणि लव्हाळ्यासारखा नम्र आहे. :**बाबासाहेब कसे आहेत, यावर अनेक विद्वानांनी प्रकाश टाकला आहे. बाबासाहेबांना स्वतःबद्दल काय वाटायचे? त्याबद्दल हळवं मनोगत त्यांनी डॉ. लक्ष्मी कबीर यांना १ जानेवारी १९४८ रोजी पाठवलेल्या पत्रात व्यक्त केलेले आहे.बाबासाहेब लिहितात, "ज्यांच्या सोबत वागणे अवघड होते असा मी एक माणूस आहे. सामान्यतः मी संथवाहणाऱ्या पाण्यासारखा शांत आणि लव्हाळासारखा नंबर आहे. पण मी जेव्हा संतापतो. तेव्हा, माझ्या माझ्यावर ताबा राहत नाही. आणि कोणी मला आवरु शकत नाही. पण एरवी मी मोन धारण करणारा माणूस आहे. मी स्त्रियाशी सहसा बोलत नाही. असा माझ्यावर आरोप केला जातो. पण पुरुषाशीही ती अगदी माझ्या विश्वासातले निकटच्या सहवासातली असल्याखेरीज बोलत नाही. मी तसा लहरी माणूस आहे. कधी मी अखंड बोलतो तर कधी मी एक शब्दही विचारत नाही. काही वेळा मी फार गंभीर होतो. तर काही वेळा हास्यविनोदात रमतो. मी मूळचा आनंदी स्वभाव असलेला माणूस नाही. आयुष्यातल्या सुखभोगाचे मला मुळीच आकर्षण नाही. माझ्या कडक स्वभावाचे आणि संन्यास्त वर्तीचे ओझे माझ्यासोबत्यांना व्हावे लागते. ८

**निष्कर्ष :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नदीजोड प्रकल्पाचे योजना प्रत्यक्षात इतर राज्यात आमलात आणल्या तर शेतकरी आत्महत्या सारखे प्रकार घडणार नाही. याची खात्री वाटते बेरोजगारी निर्मूलनाला मदत मिळेल. पशुधनाच्या समस्या सोडविले जाऊ शकते.

भारतीय मुद्रा आणि वित्त यांच्या अभ्यासासाठी ब्रिटिश कमिशन नेमले गेले. त्यांना आंबेडकरांनी सादर केलेल्या निवेदनात रिझर्व बँकेच्या निर्मितीची बीज रोवली गेली.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मामध्ये भरपूर प्रयत्न केला त्यासाठी १९३५ पासून ते १९५६ पर्यंत वाट पाहिली शेवटी नाईजाने याच भूमी मधील बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

महिलांना प्रसूती रजाचा हक्क देणे. कामगारांच्या कामाचे तास ठरवण्याचा अधिकार मिळवून दिली .

डॉ. आंबेडकरांनी मूकनायक या वर्तमानपत्रातून मांडलेल्या विचारातून त्यांचा झुंजारपणा ,त्यांचे शिक्षणाप्रतीची तळमळ, सामाजिक, आर्थिक ,सांस्कृतिक ,प्रगतीची व प्रबोधनाची ओढ आपणास पदोपदी जाणवते.

आधुनिक भारतामध्ये डॉ. आंबेडकरासारखा राष्ट्राचा विचार मुलगामी पातळीवर कोणीच केलेला नाही. राष्ट्रही संकल्पना प्रत्यक्षात आकार होण्यासाठी कोणकोणत्या घटनांची आवश्यकता असते. आणि राष्ट्राला विकृत करणाऱ्या कोणकोणत्या बाबी असतात. याचे विवेचन डॉ. आंबेडकरांनी आपल्या लेखनातून भाषणातून वेळोवेळी विशद विशद केलेले आहे .शेवटी माणूस हा श्रेष्ठ आहे. येथील माणूस टिकला तर राष्ट्र टिकेल, आणि येथील माणूस शोषणमुक्त असेल तर, राष्ट्राचे आरोग्य राहील समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, या मानवी मूल्याने मानवी जीवनाच्या उन्नतीकडे वाटचाल जाईल असे हा ठाम मत होते

**संदर्भसूची :**

१ ] महाराष्ट्र टाइम्स, कोल्हापूर आवृत्ती, गुरुवार १४ एप्रिल २०१६ पृष्ठ क्रमां. ११

२ ] उपरोक्त पृष्ठ क्रमा. ११

३ ] डॉ बाबासाहेब आंबेडकर, [ माजी आत्मकथा ] निवडक संपादक लेख, मधुश्री पब्लिकेशन पहिली आवृत्ती, २०१८ पृष्ठ क्रमां. ३५

४ ] उपरोक्त पृष्ठ क्रमा. ११

५ ] शिक्षण संक्रमण लेखानुक्रम महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, मासिक एप्रिल २०१६ पृष्ठ क्रमां. २०

६ ] उपरोक्त पृष्ठ क्रमा. २१

७ ] संपादक : डॉ. नारायण कांबळे डॉ. संजय शिंदे राजश्री शाहू नव्या दिशा. नवे चिंतन
पृष्ठ क्र. ३६३

८ ] लोकराज्य ,राजश्री छत्रपती शाहू महाराज सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ, २४ जून २०२४ पृष्ठ क्र. ६३